MHKO110017482024

**म.कौ.हि.स.अ. अर्ज क्र. ३६/२०२४.**

(CNR No.**MHKO110017482024**)

## निशाणी क्रमांक ०४ खालील आदेश.

(दिप्ती सुहास जाधव वि. सुहास पोपट जाधव)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार सौ. दिप्ती सुहास जाधव हिने, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३, अंतर्गत तिला अंतरिम पोटी मिळण्यासाठी केलेला आहे.

### अर्जदार हिचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे : -

०२. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र.१ यांची लग्नाची पत्नी असून उभयतांचे लग्न दिनांक ०२/११/२०२३ रोजी कोल्हापूर येथे संपन्न झाले असून सदर लग्नसंबंध अद्याप कायम आहे. सदरचा विवाह हा प्रेमविवाह आहे. प्रस्तुत प्रकरणातील गैरअर्जदार क्र.२ हे तिचे सासरे असून गैरअर्जदार क्र.३ ही तिचे सासू आहे.

०३. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार नं.१ कडे नांदण्यास आल्यानंतर, सुरूवातीचे काही दिवस सर्व गैरअर्जदार हे तिच्यासोबत व्यवस्थित नांदले. मात्र त्यानंतर, गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार हिला रात्री १२.०० वाजेपर्यंत त्यांचे हात पाय दाबून घेत होते. तसेच जर अर्जदार हिने त्यास नकार दिला तर गैरअर्जदार क्र.१ तिला मारहाण करत होते. गैरअर्जदार क्र.१ ते ३ हे विनाकारण शुल्लक कारणावरून अर्जदार हिची हेळसांड करून तिला मारहाण करून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून तिला व तिच्या आई-वडिलांना ठार मारण्याची धमकी देत होते. गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार ही लवकर उठत नाही, ती वेळेत जेवण करत नाही, या करणांवरून मारहाण करत होते. तसेच, गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार हिच्या आई-वडिलांना फोनवरून धमकी देत होते. त्यांनी दिनांक ११/०५/२०२३ रोजी व्हाट्सएप whatsapp वर धमकीचा संदेश पाठवून त्रास दिला आहे. या बाबत अर्जदार हिने

गैरअर्जदार यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता, त्यांच्यात कोणताही फरक पडला नाही.

०४. त्यानंतर, दिनांक २०/०६/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिला, न विचारता माहेरी जाऊन आल्याच्या करणावरून तिला सर्व लोकांसमोर लाथाबुक्यांनी मारहाण करून तिला संपवून टाकण्याची धमकी दिली. त्याचप्रमाणे, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला माहेरहून रक्कम रुपये पन्नास हजार आणण्यासाठी तगादा लावला व अर्जदार हिला शारिरीक व मानसिक त्रास देऊन अर्जदार हिचा त्याग केला आहे. त्यामुळे, अर्जदार हिला नाईलाजास्तव तिच्या आई-वडिलांकडे राहावे लागत आहे.

०५. गैरअर्जदार क्र.१ यांचे मौजे खोची येथे घर असून, त्यांचे दुचाकी दुरुस्तीचे व विक्रीचे गॅरेज असून त्यांना दरमहा रक्कम रू.५०,०००/- इतके उत्पन्न मिळते. तसेच त्यांचा गाडी भाड्याने देण्याचा देखील व्यवसाय आहे. गैरअर्जदार यांची वडिलार्जित शेती असून त्यातून त्यांना दरसाल रक्कम रू.२,००,०००/- इतके उत्पन्न मिळते. असे असताना देखील गैरअर्जदार हे अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची तसेच तिच्या कपडेलत्ते इत्यादी गरजांची पूर्तता करत नाहीत. तसेच, अर्जदार ही तिच्या माहेरी वास्तव्यास असून तिच्याकडे उदरनिर्वाहाची कोणतीही सोय नाही. सबब, अर्जदार हिने प्रस्तूत अर्ज दाखल करून गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडून दरमहा रक्कम रू.१०,०००/- इतकी अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

०६. प्रस्तुत प्रकरणामध्ये गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांना नोटीस लागू झाल्यानंतर, ते प्रकरणामध्ये त्यांच्या विधिज्ञांद्वारे हजर झाले. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी दिनांक ०६/०९/२०२४ रोजी निशाणी क्र.०७ कडे अर्ज दाखल करून त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी मुदत मिळण्याची विनंती केली. मात्र गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी आजतागायत प्रस्तूत प्रकरणामध्ये त्यांचे म्हणणे सादर केले नसल्याने दिनांक ०३/०१/२०२५ रोजीच्या निशाणी क्र.१ खालील आदेशान्वये प्रस्तूतचे प्रकरण हे

गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांच्या म्हणण्याविना पुढे चालविण्यात आले आहे.

०७. अर्जदार क्र.१ हीने निशाणी .क्र.१३ वर मालमत्ता दायित्व तथा जबाबदारी सहपत्र १ सादर केले आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र.३ यादी सोबत तिने पाठविलेली दिनांक २३/०७/२०२४ रोजीची नोटीस प्रत, आधार कार्ड प्रत, दिनांक २२/०६/२०२४ रोजीची वडगांव पोलीस ठाण्यातील फिर्याद व तक्रार अर्ज प्रत, लग्नाचे फोटो, गैरअर्जदार यांनी पाठविलेल्या दिनांक १६/०७/२०२४ रोजीची नोटीस प्रत दाखल केली आहे. तसेच निशाणी क्र.१२ यादी सोबत, नोटीसची पोच पावती, गट क्र.५९४ चा ७/१२ उतारा प्रत, नगर भूमापन क्र.६३८ चे मालमत्ता पत्रकाची प्रत हजर केली आहे.

०८. अर्जदार तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यावरून, प्रस्तुतच्या अंतरिम अर्जासाठी खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले आहेत व त्या मुद्द्यांना मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. सकृतदर्शनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दिसून येते काय ? | : | **होकारार्थी.** |
| २. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | : | **अंशतः होकारार्थी.** |
| ३. आदेश कोणता ? | : | **अंतिम आदेशानुसार.** |

## कारणमिमांसा.

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत -**

०९. सदरचे प्रकरण हे घरगुती अत्याचारापासून महिलांचे रक्षण करण्याच्या कायद्याच्या कलम १२ अन्वये दाखल केले असून प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम पोटगी

मिळण्यासाठी कलम २३ अंतर्गत दाखल केलेला आहे. अर्जातील कथने ही मूळ प्रकरणासाठी पुराव्यावर शाबीत होणे आवश्यक आहे. परंतु, कलम २३ अंतर्गत अर्जाचा विचार करतांना दोन्ही पक्षकारांची राहण्याची व त्यांच्या उत्पन्नाची स्थिती याचा विचार करणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने अर्जातील कथने विचारात घेता अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्यात पती-पत्नी नाते अस्तित्वात असल्याचे मान्य असल्याचे दिसून येते.

१०. प्रस्तुत अर्जाचा विचार करतांना सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. अर्जातील कथने पाहता त्यामध्ये वेगवेगळया घटनांची माहिती नमूद केली आहे. सदरची कथने ही, पुराव्याच्या कक्षेत सिद्ध होणे आवश्यक आहेत. अर्जदार तर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, दिनांक २०/०६/२०२४ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिला, न विचारता माहेरी जाऊन आल्याच्या करणावरून तिला सर्व लोकांसमोर लाथाबुक्यांनी मारहाण करून तिला संपवून टाकण्याची धमकी दिली. त्याचप्रमाणे, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला माहेरहून रक्कम रुपये पन्नास हजार आणण्यासाठी तगादा लावला व अर्जदार हिला शारिरीक व मानसिक त्रास देऊन अर्जदार हिचा त्याग केला आहे. अर्जदाराने तिच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.०३, अ.क्र. ३ सोबत तिने, दिनांक २१/०६/२०२४ रोजी वडगांव पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या असंज्ञेय अपराध तक्रारीची प्रत हजर केली आहे. तसेच, निशाणी क्र.०३, अ. क्र. ४ सोबत तिने, निरीक्षक वडगांव पोलीस ठाणे यांना दिनांक २२/०६/२०२४ रोजी दिलेल्या तक्रारीची प्रत हजर केली आहे. तसेच, अर्जदार हिने गैरअर्जदार यांनी दिनांक १६/०७/२०२४ रोजी पाठविलेल्या नोटीसची प्रत हजर केली आहे. प्रस्तूत प्रकरणामध्ये गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी मुदतीत त्यांचे म्हणणे सादर न केल्यामुळे प्रस्तूतचे प्रकरण हे त्यांच्या म्हणण्याविना चालविण्यात आले आहे. त्यामुळे, अर्जदार हिची सर्व कथने ही विनाआव्हानीत राहिलेली आहेत. तसेच, अर्जदार हिने पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारींवरून तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

११. अर्जदार तर्फे विधिज्ञांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, अर्जदार ही सध्या माहेरी राहात आहे व तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिने तिच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र. १३ वर मालमत्ता दायित्व तथा जबाबदारी सहपत्र १ सादर केले आहे. तसेच, निशाणी क्र. १२, अ.क्र.३ वर मौजे खोची येथील भूमापन गट क्र.५९४ च्या ७/१२ उताऱ्याची प्रत व निशाणी क्र. १२, अ.क्र. ४ वर भूमापन गट क्र.१/अ च्या ७/१२ उताऱ्याची प्रत हजर केली आहे. प्रस्तुत दोन्ही उताऱ्यांचे अवलोकन केले असता, सकृतदर्शनी असे दिसते की, गैरअर्जदार यांच्या नावे वडिलोपार्जित शेत मिळकत आहे. त्यावरून गैरअर्जदार यांना शेतीचे उत्पन्न असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार क्र.१ याचे अर्जदार हीचे पती या नात्याने पालनपोषणाची कायदेशीर व नैतिक दायित्व आहे. याउलट, ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केल्याबाबत, रक्कम पाठवल्याबाबतचा कोणताही सकृतदर्शनी पुरावा समोर आलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिचे शारीरिक व आर्थिक शोषण झाल्याचे समोर येते. तसेच, दाखल असंज्ञेय तक्रारीवरून व पोलीस निरिक्षक वडगांव यांच्याकडे सादर केलेल्या तक्रारीवरून अर्जदाराचा कौटुंबीक हिंसाचार झाल्याचे समोर येते.

१२. तसेच गैरअर्जदार क्र.१ यांची वडिलोपार्जित शेती असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा समोर आलेला आहे. अर्जदारास उत्पन्न असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा समोर आलेला नाही त्यामुळे अर्जदार हीस उत्पन्नाचा स्त्रोत असल्याचे समोर येत नाही. गैरअर्जदार क्र.१ याची पती म्हणून अर्जदाराचे पालनपोषण करण्याची जबाबदारी आहे. ती त्याने पार पाडल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रकरण दाखल झाल्यापासून अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याच्याकडून अंतरिम पोटगी खर्चापोटी मिळण्यास पात्र राहतात. प्राप्त परिस्थितीत महागाईचा विचार करता, व अर्जदार हिचे शिक्षण पहाता, अर्जदार हीस दरमहा रुपये २,०००/- अंतरिम पोटगी अर्ज दाखल झाल्यापासून मिळण्यास अर्जदार राहाते. करिता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी देवून मुद्दा क्र.३ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

# आदेश.

१. प्रस्तुत अर्ज निशाणी क्र.०४ अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हीस दरमहा रक्कम रुपये २,०००/- अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगी म्हणून मूळ अर्जाचा निकाल लागेपावतो अथवा पुढील आदेश होईपावेतो द्यावेत.

३. सदरच्या आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना निःशुल्क देण्यात यावी.

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2025.08.04 16:58:01 +0530

दिनांक – ०४/०८/२०२५. **(श्रीनिवास अ. कुलकर्णी)**

ठिकाण – पेठवडगांव. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग - पेठवडगांव.